आजचे पंचांग

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण शिशिर ऋतु, माघ मास, कृष्णपक्ष, द्वादशी संध्याकाळी ४-०२ पर्यंत
दिवस नक्षत्र- पूर्वाषाढा संध्याकाळी ६-१६ पर्यंत नंतर उत्तराषाढा
योग- सिद्धि रात्री ३-१८ पर्यंत

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## यूजीसीचे नियम धाब्यावर

**पुणे** : सार्वजनिक विद्यापीठांमधील नियमित प्राध्यापक भरतीसाठी राज्य शासनाने सुधारित अध्यादेश प्रसिद्ध केला. मात्र, हा नवा अध्यादेश प्रसिद्ध होताच त्यावर आक्षेपांची राळ उठली असून, काही प्राध्यापक संघटना आणि युवा सेना आक्रमक झाली आहे.विद्यापीठ अनुदान आयोगाची १८ जुलै २०१८ ची नियमावली धाब्यावर बसवून राज्य शासन स्वतःचे स्वतंत्र नियम लादत असल्याचा आरोप करत, ही प्रक्रिया 'वेळकाढूपणा' करणारी असल्याची टीका आता जोर धरू लागली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १४ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १४२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### दिल्लीतील शाळांना बॉम्बच्या धमक्या

**नवी दिल्ली :** शुक्रवारी सकाळी दिल्लीतील किमान पाच शाळांना बॉम्ब धोक्याचे ईमेल मिळाले, जे नंतर 'खोटे' असल्याचे घोषित करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या धमकीच्या ईमेलमध्ये प्रक्षोभक मजकूर होता, ज्यामध्ये दावा करण्यात आला होता की, "दिल्ली खलिस्तान बनेल आणि शाळांमध्ये दुपारी १.११ वाजता बॉम्बस्फोट होतील." दुपारी २.११ वाजता संसदेत स्फोट होईल, असा दावाही या ईमेलमध्ये करण्यात आला होता, त्यामुळे सुरक्षा सतर्कता वाढवण्यात आली.

### भेसळ लपवणे 'अधर्म' ठरले असते

**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी शुक्रवारी तिरुपती लाडूंच्या भेसळीच्या आरोपांबाबत सार्वजनिकरित्या जाण्याच्या त्यांच्या सरकारच्या निर्णयाचे समर्थन केले आणि म्हटले की हे प्रकरण लपवणे "अधर्म" ठरेल. निष्कर्ष रोखणे हे जनतेच्या विश्वासाचा विश्वासघात असेल. हे आरोप सप्टेंबर २०२४ चे आहेत. जगन मोहन रेड्डी यांच्या राजवटीत तिरुपती 'लाडू' तयार करण्यासाठी प्राण्यांच्या चरबीचा वापर केला जात होता, ज्यामुळे मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता.

### व्यापाऱ्याची गोळ्या घालून हत्या

**डेहराडून :** शुक्रवारी पहाटे देहरादून शहरातील सिल्व्हर सिटी सिनेमाजवळ एका व्यावसायिकाची अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या घालून हत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. गेल्या ४८ तासांत शहरातील हा दुसरा खून आहे आणि ११ दिवसांत तिसरा खून आहे. डेहराडूनचे पोलिस अधीक्षक प्रमोद कुमार यांनी माहिती दिली की, विक्रम शर्मा (५०) जिममधून बाहेर पडत असताना पहाटे १.१५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

### पंतप्रधान मोदींच्या हस्ते सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन

# पीएमओ नव्हे तर सेवा तीर्थ..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन केले. या संकुलामध्ये पंतप्रधान कार्यालयासह (पीएमओ) राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय देखील आहे. नवीन संकुलात सेवा तीर्थच्या फलकाचे मोदींनी आज अनावरण केले.

या संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत नावे लिहिली असून त्याखाली 'नागरिक देवो भव' (नागरिक देवासारखे आहे) हे ब्रीदवाक्य कोरलेले आहे. पंतप्रधान कार्यालय रायसीना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे हलवले जाईल, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेली कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाची कार्यालये एकत्र येतील.

या इमारतींची रचना मानकांनुसार केली असून, त्यात अक्षय ऊर्जा प्रणाली, जलसंवर्धन उपाय आणि डिजिटली एकात्मिक कार्यालये समाविष्ट आहेत. मोदींनी नवीन इमारतीचे उद्घाटन केले तेव्हा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

२०१४ पासून, मोदी सरकारने भारताच्या वसाहतवादी भूतकाळातील प्रतीकांपासून दूर जाण्यासाठी आणि मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की पंतप्रधान कार्यालयाला आता सेवा तीर्थ असे नाव देण्यात येईल, केंद्रीय सचिवालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे आणि राजपथाचे कर्तव्य पथ असे नाव देण्यात आले आहे. त्याच भावनेने, पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या रेसकोर्स रोडचे नाव बदलून लोक कल्याण मार्ग आणि राजभवन आणि राज निवास यांचे नाव अनुक्रमे लोकभवन आणि लोकनिवास असे करण्यात आले आहे. दशकांपासून, सेंट्रल व्हिस्टा परिसरातील अनेक ठिकाणी पसरलेल्या तुटलेल्या आणि जुन्या पायाभूत सुविधांमधून अनेक प्रमुख सरकारी कार्यालये आणि मंत्रालये कार्यरत होती.

# दादांच्या विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल लवकरच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** अपघात तपास ब्युरो बारामती विमानतळाजवळ झालेल्या लिअरजेट ४५ विमान अपघाताचे प्राथमिक निष्कर्ष लवकरच जाहीर करणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या भीषण अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह आणखी चार जणांचा मृत्यू झाला होता.

नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी शुक्रवारी सांगितले की, अपघाताचा तपास वेगाने सुरू असून प्रारंभिक अहवाल लवकरच सार्वजनिक केला जाईल. तपास प्रक्रियेत सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीचे लिअरजेट ४५ विमान २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळ येथे दुसऱ्यांदा लँडिंग करण्याचा प्रयत्न करत असताना कोसळले. या विमानातून अजित पवार त्यांच्या वैयक्तिक सुरक्षा अधिकारी, अटेंडंट तसेच कॉकपिट क्रू मेंबर्ससह प्रवास करत होते. पायलट-इन-कमांड सुमित कपूर आणि फर्स्ट ऑफिसर शांभवी पाठक यांच्यासह सर्व प्रवाशांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने यापूर्वीच अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडल्याची पुष्टी केली असून, त्याच्या विश्लेषणातून अपघाताची नेमकी कारणे स्पष्ट होण्याची अपेक्षा तपास यंत्रणांना आहे.

दरम्यान, १० फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (सपा)चे आमदार रोहित पवार यांनी या अपघातामागे संभाव्य तोडफोडीचा संशय व्यक्त केला होता. त्यांनी या प्रकरणात अनेक तज्ज्ञ आणि विविध यंत्रणांचा समावेश असलेल्या व्यापक चौकशीची मागणी केली आहे.

# तुम करे तो रासलीला... उबाठा-मनसेत जुंपली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** चंद्रपूर महानगरपालिकेतील सत्तास्थापनेच्या घडामोडींवरून उबाठा गट आणि मनसे यांच्यात तणाव निर्माण झाला असून, मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी संजय राऊत यांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली आहे. "तुम करे तो रासलीला, हम करो तो कॅरेक्टर ढिला," अशी उपरोधिक टिप्पणी करत राऊतांची वागणूक योग्य नसल्याचे देशपांडे यांनी म्हटले आहे.

चंद्रपूर महानगरपालिकेत गेल्या अनेक दिवसांपासून महापौरपदाचा तिढा सुटत नव्हता. काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत असूनही खासदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार विजय वडेट्टीवार यांच्यातील अंतर्गत मतभेदांमुळे काँग्रेसला महापौरपद मिळवता आले नाही. उबाठा गटाने काँग्रेसला डच्चू देत भाजपला पाठिंबा दिला आणि चंद्रपूर महापालिकेवर भाजपची सत्ता स्थापन झाली.

भाजपच्या संगीता खांडेकर यांची महापौरपदी निवड झाली असून, उपमहापौरपदी उबाठा गटाचे प्रशांत दानव यांची निवड करण्यात आली आहे. बहुमत असूनही काँग्रेसला विरोधी बाकांवर बसावे लागल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. त्यामुळे उबाठा गटाची भूमिका विसंगत असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात येत आहे. चंद्रपूरमध्ये उबाठाने भाजपला प्रत्यक्ष पाठिंबा दिला, तर दुसरीकडे संजय राऊत सातत्याने "उद्धव ठाकरे भाजपला कधीही मदत करणार नाहीत," असा दावा करीत असल्याकडे मनसेने लक्ष वेधले आहे.

### मंत्रालयातील लाच प्रकरणी मंत्री झिरवाळांनी राजिनामा द्यावा ; काँग्रेसची मागणी

# लाचखोर सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या घटनेमुळे राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगल्या गेल्याची टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या घटनेच्या निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे.

मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कारकून राजेंद्र ढेरंगे यांना ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तात्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका स्पष्ट केली आहे. पण राजेंद्र ढेरंगे यांनी झिरवाळ यांचे स्विय सहाय्यक रामदास गाडे यांच्या सूचनेनुसारच ही लाच घेतल्याचा दावा केला आहे. यामुळे झिरवाळ यांच्या अडचणींत वाढ झाली आहे.

या पार्श्वभूमीवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याला मंत्रालयात लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यामुळे लाचलुचपत विभागाने मंत्री कार्यालय सील केले आहे. या घटनेने राज्य सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. चौकशीदरम्यान वरिष्ठांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे या कर्मचाऱ्याने सांगितल्याची माहिती समोर येत आहे. हे आणखी धक्कादायक आणि गंभीर आहे. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने, आपल्या कार्यालयात खुलेआम लाचखोरी सुरू असल्याचे समोर आल्यावर निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे ते म्हणाले.

दरम्यान, नरहरी झिरवाळ यांनी नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना या प्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली आहे. ते म्हणाले, घडलेला प्रकार साफ चुकीचा आहे. असे व्हायला नको होते. ज्यांना पकडण्यात आले, ते क्लार्क म्हणून काम करतात. ते मूळचे अन्न व पाणी पुरवठा विभागाचे आहेत. त्यांना उसणवारीवर घेतले होते. मी या प्रकाराला पाठिशी घालणार नाही. शासकीय किंवा कायदेशीर बाब असेल त्याला त्याचा जाब द्यावा लागेल, असे ते म्हणाले. लाचखोर क्लार्क राजेंद्र ढेरंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी कोर्टापुढे हजर केले. तिथे कोर्टाने त्याची १६ तारखेपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली आहे.

मंत्रालयातील अन्न व औषध प्रशासन विभागाशी संबंधित लाचप्रकरण उघडकीस आल्यानंतर राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळणारे नरहरी झिरवाळ यांनी आपली भूमिका स्पष्ट करत अनेक मुद्यांवर सविस्तर प्रतिक्रिया दिली. या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध सिद्ध झाल्यास नैतिकतेच्या मुद्यावर तात्काळ राजीनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जर माझी कोणतीही 'लिंक' आढळली, तर पदावर राहण्याचा प्रश्नच नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

# शेख हसीनांच्या प्रत्यार्पणाची मागणी

### निवडणूक विजयानंतर बीएनपीने मांडली बाजू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ढाका :** देशातील सार्वत्रिक निवडणुकीत दणदणीत विजय मिळवलेल्या बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) ने पदच्युत माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशमध्ये खटल्याला सामोरे जाण्यासाठी भारतातून प्रत्यार्पित करण्याची मागणी पुन्हा एकदा जोरकसपणे मांडली आहे.

बीएनपीचे वरिष्ठ नेते सलाहुद्दीन अहमद यांनी सांगितले की, हसीना यांना कायदेशीर प्रक्रियेतून परत आणण्यासाठी सुरू असलेल्या राजनैतिक प्रयत्नांना पक्षाचा पूर्ण पाठिंबा आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या माध्यमातून प्रत्यार्पणासाठी आवश्यक ती पावले उचलली जात असून, या प्रक्रियेला बीएनपीचा पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कायद्याच्या चौकटीत राहून प्रत्यार्पणासाठी सातत्याने दबाव टाकण्यात येत असल्याचे अहमद यांनी सांगितले. हे प्रकरण दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्रालयांदरम्यानचे असून, भारत सरकारने हसीना यांना बांगलादेशात परत पाठवावे, अशी अधिकृत विनंती करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले. ऑगस्ट २०२४ मधील जनआंदोलनानंतर झालेल्या पहिल्या राष्ट्रीय निवडणुकीत गुरुवारी बीएनपीला स्पष्ट बहुमत मिळाले. या राजकीय उलथापालथीनंतर शेख हसीना यांना देश सोडावा लागला होता. सत्तेवरून पायउतार झाल्यापासून त्या भारत मधील नवी दिल्लीत वास्तव्यास आहेत. नोव्हेंबर २०२५ मध्ये, २०२४ च्या उठावादरम्यान झालेल्या दडपशाहीप्रकरणी विशेष न्यायाधिकरणाने हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती.

अहमद यांनी स्पष्ट केले की, बांगलादेश भारतासह सर्व प्रादेशिक भागीदारांशी संतुलित आणि समानतेवर आधारित संबंध इच्छितो. भारतासह सर्व शेजारी देशांशी परस्पर आदरावर आधारित सामान्य व मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याची बीएनपीची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

### मेट्रो कामगार क्रेनमध्ये अडकल्याने कोंडी

**पुणे :** पुण्यातील हिंजवडी आयटी पार्क परिसरात मेट्रोच्या सुरू असलेल्या कामादरम्यान आज एक दुर्दैवी घटना घडली. मेट्रो प्रकल्पासाठी वापरण्यात येणाऱ्या क्रेनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने एक कामगार उंचावर अडकून पडला. या घटनेमुळे मेट्रो स्थानकाखालील मुख्य मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली आणि परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. मेट्रो प्रशासनासह स्थानिक यंत्रणा आणि पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अडकलेल्या कामगाराला सुरक्षित खाली आणण्यासाठी तातडीने बचाव मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेदरम्यान सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या.

# बांगलादेशाने मानले आभार

### भारताबरोबर संबंध मजबूत होण्याची आशा व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशच्या सार्वत्रिक निवडणुकीतील निकाल मान्य केल्याबद्दल बीएनपीने शुक्रवारी भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि नवीन सरकारच्या काळात दोन्ही देशांमधील संबंध अधिक मजबूत होतील अशी आशा व्यक्त केली.

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) चे स्थायी समिती सदस्य आणि २०२६ च्या निवडणुकीसाठी मुख्य समन्वयक नजरुल इस्लाम खान म्हणाले की, मोदींनी जनतेच्या कौलाला मान्यता दिल्याबद्दल पक्षाचे कौतुक आहे. "आमचे नेते तारिक रहमान यांचे अभिनंदन केल्याबद्दल आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. लोकशाही देशाने जनतेचा कौल मान्य केला पाहिजे हे खूप चांगले आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे केले आहे. आम्ही त्यांचे आभार मानतो. आम्ही आमच्या पक्षाच्या वतीने त्यांचे आभार मानतो आणि आम्हाला विश्वास आहे की आमचे नेते तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखाली या दोन्ही देशांमधील आणि या दोन्ही देशांच्या लोकांमधील संबंध अधिक दृढ होतील," असे ते म्हणाले.

मोदींनी बांगलादेशच्या संसदीय निवडणुकीत बीएनपीला निर्णायक विजय मिळवून दिल्याबद्दल रहमान यांचे हार्दिक अभिनंदन केले. एक्सवरील एका पोस्टमध्ये, पंतप्रधान म्हणाले की, हा निकाल बांगलादेशी जनतेचा रहमान यांच्या नेतृत्वावरील विश्वास प्रतिबिंबित करतो.

१२ फेब्रुवारी रोजी झालेल्या निवडणुकीत ३०० सदस्यांच्या राष्ट्रीय संसदेत बीएनपीने दोन तृतीयांश बहुमत मिळवल्याने ही देवाणघेवाण झाली. २०२४ मध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील उठावानंतरची ही पहिलीच संसदीय निवडणूक आहे, ज्यामध्ये माजी पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले. बांगलादेशच्या निवडणूक आयोगाने अद्याप औपचारिक घोषणा केलेली नसली तरी, बीएनपी आणि त्यांच्या मित्रपक्षांना २१० पेक्षा जास्त जागा मिळाल्या आहेत.

### लहान मुलांच्या आरोग्य-अभ्यासाचा प्रश्न ऐरणीवर

# महाराष्ट्रातही सोशल मीडियावर निर्बंधांची गरज व्यक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** मोबाईल आणि सोशल मीडियाचा वाढता अतिरेक लहान मुलांच्या अभ्यासावर, मानसिक स्वास्थ्यावर आणि शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम करत असल्याच्या तक्रारी वाढत असताना, १६ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याचा विचार गोवा सरकार करत असल्याची माहिती माहिती व तंत्रज्ञान मंत्री रोहन खंवटे यांनी दिली आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातही अशा स्वरूपाच्या बंदीची आवश्यकता असल्याचा मुद्दा पुन्हा एकदा पुढे आला आहे.

खंवटे यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या विद्यमान कायद्यांच्या चौकटीत राहून गोव्यातील विचारवंत, तज्ज्ञ, पालक, शिक्षक आणि शैक्षणिक संस्थांचे प्रमुख यांची एक व्यापक बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीत समिती स्थापन करून सोशल मीडियातील कोणते घटक अल्पवयीन मुलांसाठी अपायकारक ठरतात, कोणते विभाग बंद ठेवावेत आणि कोणते शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त आहेत, यावर सविस्तर चर्चा केली जाईल. समितीचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार असून, आवश्यक असल्यास दिल्ली येथे केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊनही तो मांडला जाईल.

सध्या मोबाईलचा वापर शिक्षणासाठीही होत असल्याने संपूर्ण बंदीऐवजी संतुलित धोरण अवलंबण्याचा सरकारचा विचार आहे. ऑनलाइन शिक्षण, अभ्यासपूरक ॲप्स यांसारखे उपयुक्त घटक सुरू ठेवून विद्यार्थ्यांसाठी अनावश्यक असलेले मोबाईल गेम्स, हिंसक किंवा व्यसनाधीन करणारे कंटेंट आणि वेळ वाया घालवणारे सोशल मीडिया फिचर्स बंद करण्यावर भर दिला जाणार आहे.

खंवटे यांनी स्पष्ट केले की, अनेक मुले अभ्यास, खेळ आणि जेवणाकडे दुर्लक्ष करून दिवस-रात्र मोबाईलवर वेळ घालवत आहेत. रात्री उशिरापर्यंत जागरण केल्याने झोपेचा अभाव, डोळ्यांचे विकार, चिडचिडेपणा आणि एकाग्रतेचा अभाव अशा समस्या वाढत आहेत. पालकांनी मोबाईल वापराबाबत विचारणा केल्यास काही मुलांमध्ये आक्रमक वर्तन दिसून येत असल्याच्या तक्रारीही सरकारकडे आल्या आहेत.

ही परिस्थिती पाहता, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे की गोव्यातच नव्हे, तर महाराष्ट्रातही अशा प्रकारच्या निर्बंधांची गरज आहे का? महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि शहरीकरण झालेल्या राज्यात लहान वयातच मुलांचा मोबाईल आणि सोशल मीडियाशी संपर्क अधिक आहे. ऑनलाइन गेमिंग, रील्सचे व्यसन, सायबर छळ, अश्लील मजकुराचा सहज होणारा संपर्क आणि अभ्यासाकडे होणारे दुर्लक्ष या समस्या पालक, शिक्षक आणि मानसोपचार तज्ज्ञांकडून सातत्याने मांडल्या जात आहेत.

विशेषतः शहरी भागात शाळकरी मुलांमध्ये स्क्रीन टाइम झपाट्याने वाढत असून, त्याचा थेट परिणाम शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक वर्तन आणि मानसिक आरोग्यावर होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे गोवा सरकारने उचललेले पाऊल हे महाराष्ट्रासाठी दिशादर्शक ठरू शकते. अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्याची गरज पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

# राज्यातील बोगस दिव्यांग संस्थांवर टाच; ९०० संस्थांची नोंदणी रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यात दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असल्याचा दावा करणाऱ्या बोगस आणि नियमबाह्य संस्थांवर कठोर कारवाई करत सुमारे ९०० संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. विशेष म्हणजे सन २०२५ या एकाच वर्षात ३६३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आल्याची माहिती दिव्यांग कल्याण आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली.

राज्यात दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण, सक्षमीकरण आणि पुनर्वसनासाठी साधारणपणे २ हजारांहून अधिक संस्था कार्यरत आहेत. या संस्थांत नियमांचे उल्लंघन, केवळ कागदोपत्री अस्तित्व आणि शासकीय निधीचा गैरवापर करणाऱ्या संस्था आढळून आल्याने कारवाई करण्यात आली.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ५० नुसार दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व संस्थांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. संस्था सोसायटी नोंदणी कायदा, १८६०, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० किंवा कंपनी कायदा (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असल्या तरीही दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत स्वतंत्र नोंदणी आवश्यक आहे.

सर्व संस्थांनी २८ फेब्रुवारीपर्यंत संकेतस्थळावर नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत नोंदणी न केल्यास संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुंढे यांनी दिला.

# संपादकीय

## बांगलादेशातील बदलाची कसोटी



**वीस वर्षांच्या प्रदीर्घ राजकीय तणावानंतर बांगलादेशात सत्तांतर घडले आहे. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा निवडणूक विजय हा केवळ सरकार बदलाचा क्षण नाही; तो लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास, सत्तेची मर्यादा आणि भविष्यातील राजकीय शहाणपण यांची कसोटी ठरणार आहे.**

बांगलादेशात बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा विजय हा आश्चर्याचा नाही, पण तो सहज घडलेला बदलही नाही. गेली दोन दशके एका राजकीय प्रवाहाने देशाची सत्ता, संस्था आणि सार्वजनिक अवकाश व्यापून टाकल्यानंतर मतदारांनी दिलेला हा कौल 'पुरे झाले' असा स्पष्ट संकेत देतो. सत्ता ही अमर्याद काळासाठी नसते, आणि लोकशाहीत जनतेची सहनशीलताही अखंड नसते, याची ही आठवण आहे. या निवडणुकीचा निकाल पाहताना प्रथम लक्षात घ्यावी लागते ती पार्श्वभूमी. बांगलादेशात निवडणुका, विरोधकांची जागा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रशासनाची तटस्थता यांवर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. विरोधी राजकारण कमकुवत करणे, संस्थात्मक यंत्रणांचा राजकीय वापर आणि "स्थिरतेच्या" नावाखाली सत्तेचे केंद्रीकरण ही रचना हळूहळू लोकशाहीचा श्वास रोखणारी ठरू लागली. अशा स्थितीत झालेला सत्तांतराचा निर्णय हा असंतोषाचा उद्रेक म्हणूनच पाहावा लागतो. बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा विजय म्हणजे भूतकाळाचे अंधानुकरण नव्हे, तर बदलाची अपेक्षा. या पक्षाच्या सत्ताकाळाशीही अनेक वाद, आरोप आणि त्रुटी जोडलेल्या आहेत, हे विसरता येणार नाही. मात्र लोकशाहीत पर्याय महत्त्वाचा असतो. पर्याय नसेल, तर सत्ताधारी व्यवस्था स्वयंसिद्ध, अचूक आणि अबाधित असल्याचा भ्रम निर्माण होतो. बांगलादेशातील मतदारांनी हा भ्रम फोडण्याचे काम केले आहे. या बदलाचे नेतृत्व ज्यांच्याकडे जाणार आहे, त्या तारिक रहमान यांची भूमिका त्यामुळे अधिक गुंतागुंतीची ठरते. निर्वासन, आरोप आणि राजकीय संघर्ष यांचा प्रदीर्घ काळ अनुभवल्यानंतर मिळालेली सत्ता ही सूडबुद्धीने चालवण्याची संधी नसते, तर संयमाची परीक्षा असते. जुन्या जखमा कुरतडण्यापेक्षा संस्थात्मक पुनर्बांधणी, विश्वास पुनर्स्थापना आणि समावेशक राजकारण या दिशेने पावले टाकली जातात का, यावरच या सत्तांतराचे खरे मूल्य ठरेल. लोकशाहीतील सत्तांतर म्हणजे केवळ पंतप्रधान बदलणे नव्हे. न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, माध्यमे आणि सुरक्षा यंत्रणा या सर्वांनी नव्या सत्तेकडे संशयाने पाहिले पाहिजे, भक्तिभावाने नव्हे. नव्या सरकारनेही या संस्थांना आपल्या बाजूला वाकवण्याचा मोह टाळणे आवश्यक आहे. मागील अनुभवांमधून एक धडा स्पष्ट आहे : संस्था दुर्बल झाल्या, की सत्ता निरंकुश होते; आणि सत्ता निरंकुश झाली, की समाज तुटतो. आर्थिक पातळीवरही अपेक्षा मोठ्या आहेत. बांगलादेशने गेल्या काही वर्षांत विकासदर गाठला, पण त्या विकासाचे फळ सर्वसामान्यांपर्यंत कितपत पोहोचले, हा प्रश्न कायम राहिला. बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक विषमता या समस्या नव्या सरकारसमोर उभ्या आहेत. घोषणांपेक्षा धोरणात्मक सातत्य, आणि लोकप्रियतेपेक्षा कठोर निर्णय घेण्याची तयारी येथे महत्त्वाची ठरणार आहे. परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवरही हा बदल लक्षवेधी आहे. भारतासोबतचे संबंध, प्रादेशिक सुरक्षितता आणि आग्नेय आशियातील सामरिक संतुलन या साऱ्यांवर बांगलादेशाची भूमिका परिणाम घडवते. नवी सत्ता भावनिक घोषणांपेक्षा व्यवहार्य शहाणपण दाखवते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. सीमापार सहकार्य, दहशतवादविरोधी भूमिका आणि आर्थिक भागीदारी यांमध्ये सातत्य राखणे हे दोन्ही देशांच्या हिताचे आहे. या सगळ्यात एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विरोधकांची भूमिका. आज जे सत्तेत नाहीत, त्यांनीही या निकालातून धडा घ्यायला हवा. सत्तेचा गैरवापर, विरोधकांचे दमन आणि लोकशाही संकेतांकडे दुर्लक्ष यांचे परिणाम किती खोलवर जातात, हे बांगलादेशने दाखवून दिले आहे. लोकशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नाही; ती सततची संवाद, संघर्ष आणि सहमती यांची रचना आहे. शेवटी, हा बदल अंतिम उत्तर नाही, तर सुरुवात आहे. बांगलादेशातील मतदारांनी सत्ता बदलली आहे; व्यवस्था बदलण्याची जबाबदारी आता नव्या सत्ताधाऱ्यांवर आहे. लोकशाहीचे खरे यश हे सत्तेच्या स्थैर्यात नसून सत्तेच्या मर्यादेत असते. ही मर्यादा जपली गेली, तरच बांगलादेशातील हा बदल इतिहासात सकारात्मक वळण म्हणून नोंदवला जाईल.

# खोट्या प्रतिमांचा खेळ आणि वास्तवाची जबाबदारी!

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आजच्या जगात फक्त तंत्रज्ञान नाही; ती कल्पना निर्मितीची सत्ता आहे. लेखनिकांपासून कलाकारांपर्यंत, पत्रकारांपासून आमच्या रोजच्या संवादापर्यंत, एआय-निर्मित प्रतिमा आता इतक्या प्रभावी आणि तपशिलात आहेत की त्या वास्तविकतेपासून अगदी वेगळ्या दिसत नाहीत. पण तितक्या वास्तविक दिसणाऱ्या या प्रतिमांमागे काय सत्य आणि काय खोटे, हे ओळखून घेणे इतकेच आवश्यक झाले आहे. एआय-जनरेटेड प्रतिमा या सुरुवातीच्या काळात इच्छेनुसार तयार केलेल्या कल्पनांनी भरलेल्यासारख्या होत्या. त्या चित्रांमध्ये स्पष्ट कलात्मक त्रुटी दिसत. परंतु आजच्या तंत्रज्ञानाने त्या त्रुटींवर मात केली आहे. प्रतिमा बनविण्याची प्रक्रिया इतकी सूक्ष्म आणि वास्तवाबद्दल इतकी 'अचूक' दिसू लागली आहे की सामान्य पाहणाऱ्याला ते खरे की बनावट, हे ओळखणे अवघड झाले आहे. या बदलामुळे 'विश्वसनीयता' आणि 'भरोसा' या संकल्पना जगभरात पुन्हा विचारात घेतल्या जात आहेत. तांत्रिक दृष्टिकोनातून हा विकास निश्चितच कौतुकास्पद आहे. एआयचे तंत्रज्ञान हे प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडते—डिझाईन, शिक्षण, वैद्यकीय तपासणी, सांस्कृतिक अभिव्यक्ती या साऱ्यात. परंतु समस्या तेव्हा प्रगल्भ रूप धारण करते, जेव्हा या प्रतिमांना कोणत्याही मूल्यांकन, सत्यापन आणि लेबलिंग शिवाय सार्वजनिक पटलावर मोकळे सोडले जाते. प्रतिमा ही माध्यमांची मूळ भाषा बनत आहे. आम्ही पाहतो, आम्ही ओळखतो, आम्ही त्यापासून अर्थ लावतो. परंतु जर ही भाषा चुकीच्या माहितीवर आधारित असेल, तर तिचा प्रभाव फक्त 'भ्रामक' राहण्यापुरताच मर्यादित राहत नाही; ती समाजात भ्रम, द्वेष, राजकीय चढाओढ आणि विभाजन निर्माण करण्यास सक्षम ठरते. या संभाव्य धोक्याचा विचार केवळ तंत्रज्ञ किंवा डेटा वैज्ञानिक करतात, असा समज ही मोठी चूक आहे. आपण सामान्य नागरिकही या परिणामांची जबाबदारी समजून घ्यायला हवी. एआय-निर्मित प्रतिमांमध्ये असलेली "वास्तविकता" ही सरळ समजून घेण्याजोगी प्रतिमा नसून, ती तरीही एक मॉडेलच्या प्रशिक्षणावर आधारित परिकल्पना आहे. मॉडेलमागील डेटा म्हणजे जुने चित्र आणि भाषिक नमुने होते, जे पूर्वीच्या संदर्भात खरे असले तरी आजच्या वास्तवाशी तंतोतंत जुळतीलच असे नाही. त्यामुळे त्या प्रतिमांमध्ये 'वास्तविकतेचा विसर'

**» कृत्रिम बुद्धिमत्ता तयार करीत असलेल्या प्रतिमांची गुणवत्ता, आशय आणि भरोसा यावरून उद्भवणारे प्रश्न केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक आणि नैतिकदृष्ट्या निर्णायक बनले आहेत. चुकीचा डेटा, फसवणूक आणि प्रतिमात्मक दुरुपयोग यापुढे समाजाचे भवितव्य ठरवू शकतात.**



किंवा 'तथ्यांपासून हटता दिशेने संकेत' येण्याची शक्यता वाढते. एखादी प्रतिमा पाहताच आपल्याला ते सत्य वाटू लागले, हेच खरी समस्या आहे. मीडिया, शैक्षणिक जागा, सार्वजनिक संभाषण आणि धोरणनिर्मिती या सर्व ठिकाणी पुरावे-आधारित चर्चा अपेक्षित असते. परंतु आज एखादी सुंदर, आकर्षक किंवा संवेदनशील प्रतिमा पाहून तिला 'नैसर्गिक सत्य' समजणे हे खूपच सामान्यत: होते आहे. याचा अर्थ असा आहे की प्रतिमेच्या पलीकडे असलेल्या तत्त्व आणि संदेशाकडे आपण दुर्लक्षित होतो आहोत. याच कारणास्तव एआय-प्रतिमांचा लेबलिंग हा मूलभूत प्रश्न बनला आहे. साधेपणाने सांगायचे तर जर प्रतिमा बनावट आहे, तर तिला त्या स्वरूपात ओळखायची स्पष्ट पद्धत असावी. जर ती वास्तविक वस्तुस्थितीवर आधारित आहे, तर त्याबद्दलची पारदर्शकता समाजाला समजून देणे आवश्यक आहे. नागरिकांना हे कळावे की एखादी प्रतिमा एआयद्वारे तयार केली आहे किंवा तिचा स्रोत मानवी निरीक्षणावर आधारित आहे, हे स्पष्टपणे दर्शवले पाहिजे. या मुद्द्याचे गंभीर परिणाम आहेत. राजकारणात, समाज माध्यमांत, न्यायालयीन प्रक्रियेत, शिक्षण आणि माहिती सेवांमध्ये प्रतिमा हा निर्णायक पुरावा मानला जातो. जर तो पुरावा बनावट असेल आणि त्यावर निर्णय घेण्यात येईल, तर समाजाच्या विश्वासाला मोठा धक्का बसेल. त्यामुळे प्रतिमेच्या पद्धतीनुसार त्यावर लेबलिंग आणि सत्यापनाची आवश्यकता बनते, नाहीतर चुकीच्या माहितीच्या प्रभावामुळे लोकशाही प्रक्रियाही हळूहळू धावपळीत बदलण्याचा धोका आहे. काही देशांमध्ये हे विचार धोरणाच्या पातळीवर येऊ लागले आहेत. प्रतिमांच्या मागील तंत्रज्ञानावर आधारित माहितीचा स्रोत, ऑगमेंटेड किंवा एआय-जनरेटेड असल्याचे स्पष्टपणे दाखवणे, यासारखे नियम लोकांसमोर ठेवले जात आहेत. पण हे प्रयत्न जगभरात एकसारखे लागू झालेले नाहीत आणि त्यामुळे फसवणूक करणाऱ्या घटकांना फायदा मिळण्याची शक्यता वाढली आहे. हे सर्व विचारात घेतल्यास, आमच्या जबाबदारीचा स्तर केवळ तंत्रज्ञानाचे स्वागत किंवा नकार करण्यापुरता मर्यादित राहू नये. प्रतिमांच्या पारदर्शकतेची आणि सत्यतेची जबाबदारी आपण सार्वजनिक अंतरावर स्वीकारली पाहिजे. यामुळे लोकांना फक्त दृश्यांची आकस्मिक अनुभवता येणार नाही, तर त्या दृश्याच्या विश्वासार्हतेची जाण आणि सुज्ञ निर्णय क्षमता विकसित करता येईल. लोकशाही, माहिती, तंत्रज्ञान आणि नागरिकांची जागरूकता या साऱ्याचा एकत्रित संगम आजच्या समाजाचे भविष्य घडवेल. प्रतिमा, व्हिडिओ किंवा इतर कोणतेही दृश्य माध्यम जर चुकीच्या माहितीची भाषा वापरत असेल, तर त्यापासून संसदीय, सामाजिक आणि आर्थिक निर्णय चुकीच्या दिशेने जाऊ शकतात. त्यामुळे एआय-निर्मित प्रतिमांवर योग्य लेबलिंग, स्रोताची स्पष्टता आणि माहितीची पारदर्शकता हे केवळ तांत्रिक नियम नव्हे, तर सामाजिक गरज आहे. शेवटी विचार करण्यासारखे इतकेच आहे की तंत्रज्ञान कसे विकसित होते आणि समाज त्याला कसे स्वीकारतो? याची जबाबदारी फक्त कंपन्यांची नसावी; ती शासनांची, माध्यमांची, नागरिकांची आणि शैक्षणिक संस्थांची आहे. प्रतिमांचे सूक्ष्म विश्लेषण, पारदर्शक स्रोत, आणि सत्यता यांना प्राधान्य दिल्यास समाज अधिक सजग, निर्णयक्षम आणि वास्तववादी बनू शकतो. नाहीतर या गोंधळात आपले चिंतन आणि निर्णय दोन्ही एकमेकांना हरवून देतील.v

# पर्यावरण सुरक्षिततेसाठी 'डिब्रिस एनओसी' बंधनकारक

## बांधकाम राडारोडा विल्हेवाट लावण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' आवश्यक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पर्यावरण सुरक्षितता आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने रेल्वे मार्ग, नदीपात्रे व सार्वजनिक परिसरांमध्ये बांधकाम कचरा (डिब्रिस) अयोग्य पध्दतीने टाकल्यामुळे मोठ्या प्रमाणावर समस्या निर्माण होत असल्याचे प्रशासनाला निदर्शनास आले आहे. त्यामुळे Pune Municipal Corporation ने बांधकामानंतर तयार होणाऱ्या राडारोडा किंवा इतर डिब्रिसच्या विल्हेवाट लावण्यासाठी



'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) घेणे आवश्यक ठरविले आहे. नियमावलीप्रमाणे हा प्रमाणपत्र प्रकल्प पूर्ण होण्याच्या जोते तपासणीपर्यंत (जोता सर्टिफिकेट) मिळणे गरजेचे आहे, असे महापालिका अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी स्पष्ट केले आहे. नवीन नियमावलीनुसार बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर आणि राडारोडा कुठे टाकला जातो, याचा तपशील संबंधित विकासकाने महापालिकेला सादर करणे बंधनकारक आहे. यानंतरच जोते तपासणी प्रमाणपत्र दिले जाईल. तसेच, राडारोडा सार्वजनिक ठिकाणी टाकण्याची किंवा नदीपात्रात साठवण्याची घटना आढळल्यास महापालिकेच्या निरीक्षकांनी पोलीस विभागाकडे तक्रार नोंदवून पुढील कारवाई करावी, असे आदेशही कौर यांनी सांगितले आहेत. या नवीन नियमावलीने सर्रास बांधकाम व्यावसायिकांकडून वेगवेगळ्या भागात राडारोडा टाकल्यामुळे झालेले पर्यावरणीय नुकसान रोखण्याचा आणि पर्यावरण निगा राखण्याचा महत्त्वाचा उद्देश साध्य केला आहे. V

# कोथरूड शिक्षण संस्थेच्या आवारातून महागडा लॅपटॉप चोरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील कोथरूड भागात एका नामांकित शैक्षणिक संस्थेच्या आवारातून महाविद्यार्थ्याकडील सुमारे ₹1,80,000 किमतीचा लॅपटॉप चोरीला गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेने विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये चिंतेची लाट पसरली असून पोलीस तपास सुरू आहे.

पोलिसांनुसार, पौड रस्ता परिसरात शिकणारा एक महाविद्यालयीन विद्यार्थी सकाळी कॉलेजच्या आवारात आला होता आणि त्याने आपली बॅग ठेवली. त्याच बॅगेतील लॅपटॉप चोरीला गेल्याचे त्याने लक्षात आल्यावर कोथरूड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज तपासले असून पोलीस हवालदार दळवी हा तपास करीत असल्याचे सांगितले आहे. याच संदर्भात नऱ्हे भागातही एका महाविद्यार्थ्याच्या लग्न सोबत महागड्या मोबाईल आणि लॅपटॉप चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.

# पुणे महापालिकेने नदीपात्रात राडारोडा टाकल्याप्रकरणी कडक कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** शहरातील नदीकाठच्या मुठा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर बांधकामाचा कचरा (राडारोडा) टाकल्याच्या प्रकरणी Pune Municipal Corporation आणि पोलीस विभागाने कडक कारवाई केली आहे. शिवाजीनगर-तोफखाना भागात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बांधकाम प्रकल्पातून राडारोडा नदीमध्ये टाकल्याचे आढळल्यावर महापालिकेने संबंधित विकासकाविरुद्ध दहा लाख रुपयांचा दंड लावून काम थांबविले आहे तसेच फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकारात महापालिकेला संशयास्पद राडारोडा टाकणाऱ्यांचा शोध मध्यरात्री सुमारे दोन वाजता लावता आला, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले आहे. नदीपात्राजवळ महापालिका मुख्यालयापासून केवळ काही मीटर अंतरावर राडारोडा सापडल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष व्यक्त झाला. संबंधित व्यावसायिकाला नोकरी थांबविण्याचे आदेश देण्यात आले असून महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आणखीही कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की सार्वजनिक ठिकाणी किंवा नदीकाठच्या भागात बांधकाम कचरा टाकणे गंभीर पर्यावरणीय उल्लंघन आहे आणि यामुळे नदीच्या प्रवाहात अडथळा, पाण्याच्या वाहतुकीवर विपरीत परिणाम आणि संभाव्य पूरधोक्याची जोखीम निर्माण होऊ शकते. यापुढे कोणत्याही बांधकाम प्रकल्पातून तयार झालेला राडारोडा नदीपात्रात, रस्त्यांवर किंवा इतर सार्वजनिक जागेत टाकल्यास कठोर परिणाम भोगावे लागतील, असेही महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पुणे विद्यापीठामध्ये 'भयंकराच्या दरवाजात कोण?'चा अभिवादनातून उलगडा?

## संत सेवालाल महाराज व नामदेव ढसाळ जयंतीनिमित्त विशेष सांस्कृतिक कार्यक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** संत सेवालाल महाराज आणि महाकवी नामदेव ढसाळ यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अभिवादनपर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक भान, साहित्यिक विचार आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा संगम घडवणारा हा कार्यक्रम रविवारी, १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजल्यानंतर ललित कला केंद्रातील अंगण मंच येथे रंगणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे 'निर्माण आर्ट्स' प्रस्तुत कवी नामदेव ढसाळ यांच्या निवडक कवितांवर आधारित नृत्यप्रयोग 'भयंकराच्या दरवाजात कोण?'.




ढसाळ यांच्या विद्रोही, वास्तवदर्शी आणि संवेदनशील कवितांना नृत्याच्या माध्यमातून नवी अभिव्यक्ती देण्याचा हा प्रयत्न आहे. समाजातील विषमता, संघर्ष आणि परिवर्तनाच्या प्रश्नांना कलात्मक रूपातून सादर करत हा प्रयोग प्रेक्षकांना अंतर्मुख करणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन मयूर शितोळे यांनी केले असून, प्रभावी पोस्टर डिझाईन संतोष देशपांडे यांनी साकारले आहे. कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ कर्मचारी संघाचे सतीश वाघमारे व संतोष मदने तसेच विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समितीचे राहुल ससाणे आणि किरणकुमार भद्रे यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरात सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक समृद्धीचा संदेश देणारा हा उपक्रम ठरणार असून, विद्यार्थ्यांसह पुणेकर नागरिकांनाही याचा लाभ घेण्याची संधी आहे. कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असला तरी नोंदणी आवश्यक आहे. प्रवेशासाठी समाधान दुपारगुडे व अरुण जाधव यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. साहित्य, विचार आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा संगम अनुभवण्यासाठी श्रोतेवर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## खासदार नीरज डांगी यांची केंद्र सरकारकडे पूर्ववत सवलत सुरू करण्याची ठाम मागणी

# राज्यसभेत पत्रकारांच्या रेल्वे सवलतीचा मुद्दा गाजला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** कोविडपूर्व काळात अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना मिळणारी ५० टक्के रेल्वे प्रवास सवलत तात्काळ पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम व जोरदार मागणी काँग्रेसचे राज्यसभा खासदार नीरज डांगी यांनी शून्य काळात उपस्थित केली. पत्रकारांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधत त्यांनी रेल्वे प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पत्रकारांच्या या मागणीसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद सातत्याने पाठपुरावा करत आहे. परिषदेचे मुख्य





विश्वस्त एस. एम. जोशी यांनी राज्यसभेत मुद्दा मांडल्याबद्दल डांगी यांचे आभार मानले. यापूर्वी विविध पक्षांच्या खासदारांनीही संसदेत हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे पत्रकार संघटनांकडून या विषयाला व्यापक पाठिंबा मिळत आहे.

कोविड महामारीच्या काळात केंद्र सरकारने पत्रकार व ज्येष्ठ नागरिकांच्या रेल्वे सवलती तात्पुरत्या स्वरूपात स्थगित केल्या होत्या. मात्र, देशातील बहुतांश निर्बंध हटवून सर्व सेवा पूर्ववत सुरू झाल्यानंतरही पत्रकारांची सवलत अद्याप लागू करण्यात आलेली नाही. यामुळे विशेषतः श्रमिक, ग्रामीण व स्वतंत्र पत्रकारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. वार्तांकनासाठी देशभर प्रवास करावा लागणाऱ्या पत्रकारांवर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडत असल्याचे डांगी यांनी नमूद केले. "पत्रकारोंको यात्रा रियायतो से वंचित रखना अप्रत्यक्ष रूपसे उनकी कार्यक्षमता को सीमित करता है," असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी सरकारने तात्काळ प्रभावाने ही सवलत पुन्हा सुरू करावी, अशी मागणी केली. तसेच या संदर्भात स्पष्ट, पारदर्शक आणि कायमस्वरूपी धोरण जाहीर करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. मात्र, चर्चेनंतरही रेल्वेमंत्र्यांकडून कोणतेही ठोस आश्वासन देण्यात आले नसल्याने पत्रकार संघटनांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

सवलत पुन्हा सुरू करण्याबाबत सरकारची भूमिका अद्याप अस्पष्ट असल्याची टीका होत आहे. पत्रकार हे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे प्रतिनिधी असून त्यांना किमान पूर्वीप्रमाणे सुविधा मिळाव्यात, अशी मागणी पुन्हा जोर धरत आहे.

**पत्रकारांच्या रेल्वे सवलतीचा मुद्दा का महत्त्वाचा?**

- **कोविडपूर्व सवलत :** अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना रेल्वे प्रवासात ५०% सवलत मिळत होती.
- **कोविडनंतर स्थिती :** महामारीदरम्यान सवलत स्थगित; निर्बंध हटूनही सवलत अद्याप पूर्ववत नाही.
- **संसदेतील आवाज :** नीरज डांगी यांनी राज्यसभेत शून्य काळात मुद्दा उपस्थित करत तात्काळ अंमलबजावणीची मागणी केली.
- **संघटनांचा पाठपुरावा :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद सातत्याने रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करत आहे.
- **परिणाम :** श्रमिक, ग्रामीण व स्वतंत्र पत्रकारांवर अतिरिक्त आर्थिक भार.
- **मागणी :** स्पष्ट, पारदर्शक व कायमस्वरूपी धोरण जाहीर करून सवलत तात्काळ सुरू करावी.
- **सध्याची स्थिती :** रेल्वेमंत्र्यांकडून ठोस आश्वासन नाही; पत्रकार संघटनांत नाराजी.

दरम्यान, पत्रकार संघटनांनी हा मुद्दा सोडणार नसल्याचे स्पष्ट केले असून, सवलत पूर्ववत होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# आरटीई अंतर्गत प्रवेश जागांमध्ये मोठी घट; गेल्या ९ वर्षांत १३,२५५ जागा कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) आरक्षित २५ टक्के जागांमध्ये मोठी घट नोंदवली गेली असून, गेल्या नऊ वर्षांत ३२५ शाळा व १३,२५५ प्रवेश जागा कमी झाल्या आहेत, असे आरटीईसंबंधित संघटना यांनी आज स्पष्ट केले. या घटेमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांच्या शाळांमध्ये प्रवेशाच्या संधीवर परिणाम होत असल्याचे चिंतेचे मुद्दे निर्माण झाले आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थी आणि वंचित गटातील मुलांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव प्रवेश देण्याचा आरटीईचा उद्देश आहे. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मध्ये ८,९८० शाळांमध्ये १,२६,१४० जागा उपलब्ध होत्या, तर २०२६–२७ साठी केवळ ८,६५५ शाळांमध्ये १,१२,८८५ जागा उपलब्ध झाल्या आहेत, असे आरटीई प्रवेश प्रक्रियेतील डेटा दर्शवितो. ९ वर्षांतही प्रवेश जागांची संख्या लक्षणीय घटलेली आहे. आ. भा. समाजवादी शिक्षण हक्क सभेचे कार्याध्यक्ष डॉ. शरद जावडेकर आणि २५ टक्के आरक्षण पालक सभेच्या अध्यक्ष सुरेखा खरे यांनी सांगितले की, अनेक स्कूल आरटीई प्रक्रियेपासून बाहेर पडत आहेत किंवा अल्पसंख्याक दर्जा घेत आहेत, ज्यामुळे आरटीईच्या नियमांतुन सुटण्यासाठी सुविधा मिळत आहे. यामुळे आरटीईच्या उद्दिष्टांची पूर्तता होत नाही आणि गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याची संधी कमी होत आहे, असे त्यांनी म्हटले आहे. या वर्षासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया ९ जानेवारीपासून सुरू करण्यात आली असून, ८,६५३ शाळांनी नोंदणी केली आणि १,१२,७५१ प्रवेश जागा उपलब्ध झाल्या आहेत, परंतु अद्याप प्रवेशासाठी विद्यार्थी नोंदणी प्रक्रियेला अजून सुरूच आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### किरकोळ वादातून मित्राचा चाकूने खून

**चाकण :** किरकोळ कारणावरून झालेल्या वादात तरुणाने आपल्या मित्रावर चाकूने सपासप वार करून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना नाणेकरवाडी (ता. खेड) येथे बुधवारी रात्री घडली. किशोर सुरेश राणे (वय २५) असे मृत तरुणाचे नाव असून कपिल जितेंद्र कोसलकर याला पोलिसांनी अटक केली आहे. छाती व बरगड्यांवर गंभीर वार झाल्याने राणे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी दक्षिण चाकण पोलीस तपास करत आहेत.

### आंबेगाव येथे बिबट मादी जेरबंद

**पारगाव :** नागापूर (ता. आंबेगाव) येथे शुक्रवारी पहाटे बिबट मादी वनविभागाने पिंजऱ्यात जेरबंद केली. मागील दोन महिन्यांपासून परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण होते. पवार मळा परिसरात लावलेल्या पिंजऱ्यात बिबट अडकल्याची माहिती मिळताच वनकर्मचाऱ्यांनी तातडीने कारवाई केली. पकडलेल्या बिबट मादीची वैद्यकीय तपासणी करून तिला माणिकडोह बिबट निवारा केंद्र येथे हलविण्यात येणार आहे.

### विजया एकादशीला आळंदीत भाविकांची गर्दी; आरती उत्साहात

**आळंदी :** विजया एकादशी निमित्त श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे सुमारे पन्नास हजार भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. मंदिरात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती. पहाटे पवमान अभिषेक, हरिनाम गजर, कीर्तन व फराळाचा महाप्रसाद असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. इंद्रायणी नदी घाटावर स्वच्छता अभियान राबवून उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते इंद्रायणी आरती उत्साहात झाली. पोलिसांच्या नियोजनामुळे वाहतूक सुरळीत राहिली.

---

चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील सुमारे ५० प्रवाशांचे प्राण बचावले

# 50 प्रवाशांना घेऊन निघालेली बस आगीत खाक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



चाकण एमआयडीसी मध्ये आग लागलेल्या बसची झालेली अवस्था. (छाया : अविनाश दुधवडे, चाकण )

**चाकण :** पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित (पीएमपीएमएल) ची धावती इलेक्ट्रिक बस शुक्रवारी (दि. १३) सकाळी चाकण एमआयडीसी परिसरात अचानक पेट घेतल्याने मोठी खळबळ उडाली. महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीसमोर घडलेल्या या भीषण घटनेत बस पूर्णपणे जळून खाक झाली. मात्र चालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील सुमारे ५० प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले.

एमएच १२ एसएफ १३८८ क्रमांकाची ही बस निघोजे–महाळुंगे मार्गावरून कामगारांना घेऊन जात होती. सकाळी सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास बसच्या इंजिनखालील भागातून अचानक धूर निघू लागला. धुराचे लोट वाढताना पाहून चालकाने तत्काळ परिस्थितीचे गांभीर्य ओळखले आणि बस रस्त्याच्या कडेला थांबवली. वाहकाच्या मदतीने सर्व प्रवाशांना घाईघाईने खाली उतरवण्यात आले.

प्रवासी सुरक्षित अंतरावर गेल्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी धाव घेत प्राथमिक स्वरूपात आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीची तीव्रता मोठी असल्याने प्रयत्न निष्फळ ठरले. त्यानंतर निघोजे अग्निशमन दल तसेच महिंद्रा कंपनीचे अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत बस पूर्ण जळून केवळ लोखंडी सांगाडा उरला होता. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. चालकाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली. दरम्यान, औद्योगिक भागात धावणाऱ्या इलेक्ट्रिक बसेसची नियमित तांत्रिक तपासणी, वायरिंगची पाहणी आणि अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

---

## नातीच्या प्रसंगावधानामुळे आजीवरचा बिबट्याचा हल्ला टळला



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मंचर परिसरातील विकासवाडी, महाळुंगे पडवळ येथे धाडसी प्रसंगावधानामुळे एका वृद्ध महिलेचे प्राण वाचल्याची घटना घडली. बेबीताई शिवराम पडवळ (वय ७०) या रात्री सुमारे ११.१५ वाजता घरासमोरील पडवीत चुलीजवळ बसून शेंगा फोडत होत्या. त्याचवेळी एका मांजराचा पाठलाग करत बिबट्या अचानक पडवीत शिरला. घाबरलेले मांजर आजीच्या पाठीमागे लपल्याने बिबट्याने थेट आजींवर झडप घालण्याचा प्रयत्न केला.

हा प्रकार पाहताच शेजारी असलेल्या नाती अनुष्का प्रकाश पडवळ हिने प्रसंगावधान राखत जोरात आरडाओरड केली. अचानक झालेल्या गोंधळामुळे बिबट्याने धूम ठोकली. मात्र मांजराशी झालेल्या झटापटीत आजीच्या उजव्या पायाला बिबट्याचे नख लागून त्या किरकोळ जखमी झाल्या. बिबट्याने मांजर पकडून घटनास्थळावरून पळ काढला. जखमी आजींना तत्काळ महाळुंगे पडवळ येथील शासकीय रुग्णालयात नेऊन रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली. वनरक्षक रईस मोमीन यांनी घटनास्थळी पाहणी करून नागरिकांना सावधगिरीच्या सूचना दिल्या. घराभोवतीची अडगळीची ठिकाणे स्वच्छ ठेवावीत. पडवीत वयोवृद्ध व्यक्तींना झोपवू नये, असे आवाहन करण्यात आले.

---

## शिक्षण महर्षी स्व. विलासराव तांबे यांना १५ व्या पुण्यतिथीनिमित्त कृतज्ञ अभिवादन

ओतूर येथील शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसीत श्रद्धांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी स्व. विलासराव तांबे यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त भावपूर्ण अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी नुकत्याच झालेल्या अपघाती निधनामुळे राज्यात शोककळा पसरविणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. विलासराव तांबे आणि स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष विशाल विलासराव तांबे यांनी स्व. तांबे सरांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसार आणि समाजउन्नतीसाठी समर्पित केले. “शिक्षण सर्वांसाठी” हे ब्रीद अंगीकारून ग्रामीण व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना, विशेषतः महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यांच्या प्रयत्नांतून उभ्या राहिलेल्या शैक्षणिक संकुलामुळे हजारो विद्यार्थ्यांचे जीवन उज्ज्वल झाले आहे,” असे त्यांनी नमूद केले.

विशाल तांबे यांनी पुढे सांगितले की, अजित पवार यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या दोन इमारतींचे उद्घाटन झाले होते. त्यांच्या नेतृत्वाचा आणि मार्गदर्शनाचा अभाव आज प्रकर्षाने जाणवत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी स्व. तांबे सरांचे कार्य ही एक जिवंत शैक्षणिक चळवळ असल्याचे प्रतिपादन केले. ग्रामीण व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी उभारलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास मानद सचिव वैभव तांबे, संचालिका श्रीमती नीलम विलासराव तांबे, खजिनदार मयूर ढमाले, प्राचार्य डॉ. गोविंद खरात, डॉ. रमेश काकड, डॉ. संजय देवकर, मुख्याध्यापक माणिक बोऱ्हाडे, संतोष झावरे, बसीर शेख, डॉ. स्मिथ ॲलेक्स यांच्यासह सर्व शाखांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

# आळंदीत राष्ट्रपित्याच्या पुण्यस्मरण दिनी भजन-प्रार्थनेतून अभिवादन!

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी व आळंदी नगरपरिषदेचे संयुक्त आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या रक्षा विसर्जन स्मृतीदिनानिमित्त आळंदीत गुरुवारी (दि. १२) भजन, सर्वधर्म प्रार्थना व अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि आळंदी नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने इंद्रायणी नदी घाटावरील रक्षा विसर्जन स्तंभ येथे हा कार्यक्रम पारंपरिक पद्धतीने पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वधर्म प्रार्थनेने झाली. धनंजय पवार व मोहिनी पवार यांनी सुश्राव्य आवाजात भजन सेवा सादर करत वातावरण भक्तिमय केले. “अहिंसा, सत्य आणि सर्वधर्मसमभाव” या गांधीजींच्या विचारांचा पुनरुच्चार करत उपस्थितांनी राष्ट्रपित्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. या वेळी आळंदी नगरपरिषद नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे पदाधिकारी प्रवीण सप्तर्षी, अन्वर राजन, आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे विश्वस्त अर्जुन मेदनकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. ज्ञानेश्वर विद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, नागरिक आणि भाविकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

अभिवादन सभेत गांधीजींच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित करण्यात आली. समाजात वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अहिंसा, बंधुता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश अधिक प्रभावीपणे रुजवण्याची गरज व्यक्त करण्यात आली. मान्यवरांनी रक्षा विसर्जन स्मारकाजवळ पुष्पांजली अर्पण करून आदरांजली वाहिली. गांधीजींच्या हत्येनंतर त्यांच्या इच्छेनुसार देशातील प्रमुख नद्यांमध्ये अस्थी विसर्जन करण्यात आले होते. त्यापैकी एका कलशातील अस्थी १२ फेब्रुवारी १९४८ रोजी आळंदी येथील इंद्रायणी नदीत विसर्जित करण्यात आल्या. त्या स्मृतीप्रित्यर्थ येथे रक्षा विसर्जन स्तंभ उभारण्यात आला आहे. गेली ७८ वर्षे १२ फेब्रुवारी रोजी येथे गांधीजींना अभिवादन करण्याची परंपरा अखंड सुरू आहे. या कार्यक्रमातून राष्ट्रपित्याच्या विचारांचे स्मरण करत समाजात शांतता, सद्भाव आणि मानवतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

---

## डुंबरवाडी टोलचा काय आहे झोल? स्थानिकांना अचानक का बसतोय टोल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** सुरुवातीपासूनच विविध वादग्रस्त मुद्द्यांमुळे चर्चेत असलेल्या डुंबरवाडी टोल नाका बाबत सध्या सर्वसामान्य जनतेतून प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या चार दिवसांपासून स्थानिक वाहनचालकांना दिली जाणारी टोलसवलत बंद करण्यात आल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते तान्हाजी तांबे यांनी सांगितले की, २०१९ पासून डुंबरवाडी येथे टोलवसुली सुरू असून स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सूचनेनुसार जुन्नर तालुका येथील वाहनचालकांना टोलमध्ये सवलत दिली जात होती. मात्र, ‘रक्षक सिक्युरिटी’ या कंपनीने तीन महिन्यांसाठी टोलवसुलीचा ठेका घेतल्यानंतर स्थानिकांनाही टोल आकारणी सुरू केली आहे. कारसाठी मासिक पास सक्तीचा करण्यात आला असून अन्यथा नियमित टोल भरण्याची सक्ती केली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या निर्णयामुळे स्थानिक वाहनचालक आणि शेतकरी वर्ग संतप्त झाला आहे. परिसरातील शेतकरी आपला शेतीमाल ओतूर व आळेफाटा येथील बाजार समित्यांमध्ये विक्रीसाठी नेतात. आधीच शेतीमालाला बाजारभाव नसताना टोलवसुलीमुळे अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. जुन्नर तालुक्यातील वाहनचालकांना आधारकार्ड दाखविल्यानंतर टोलमधून सवलत द्यावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा टोलनाक्यावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तान्हाजी तांबे यांनी दिला आहे.

दरम्यान, स्थानिक लोकप्रतिनिधींकडून लेखी पत्र दिल्यानंतर संबंधित नियम शिथिल केला जाईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, तोपर्यंत टोल प्रशासनाची भूमिका काय राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

## स्कूल बसला हायवा ट्रकची धडक;4 वर्षांचा बालक गंभीर!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील ढोरे भांबुरवाडी परिसरात गुरुवारी (दि. १२) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास शाळेची बस आणि हायवा ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात चार वर्षांचा एक बालक गंभीर जखमी झाला असून आठ विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून पालकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पानमळा येथील डी. जे. केंब्रिज स्कूलची बस (क्र. एमएच १४ जीडी ४११९) विद्यार्थ्यांना घरी सोडण्यासाठी जात असताना समोरून येणाऱ्या हायवा ट्रकने (क्र. एमएच १३ सीयू ६२३५) जोरदार धडक दिली.

---

# जुन्नरमध्ये रुग्ण हक्क परिषदेची तालुक्यातील पहिली शाखा सुरू

संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन; ‘कॅन्सर मुक्त महाराष्ट्र’ अभियानाला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** रुग्णांच्या न्याय हक्कांचे संरक्षण, योग्य उपचारांसाठी मार्गदर्शन आणि सर्वसामान्यांना वैद्यकीय व्यवस्थेत न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने आयएसओ मानांकित रुग्ण हक्क परिषद यांच्या जुन्नर तालुक्यातील पहिल्या शाखेचे उद्घाटन सय्यद वाडा येथे उत्साहात पार पडले. परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, नवनिर्वाचित नगरसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नव्या शाखेच्या अध्यक्षपदी दोस्त मोहम्मद सय्यद, उपाध्यक्षपदी वफा सय्यद आणि कार्याध्यक्षपदी बाबा हसन सय्यद यांची निवड करण्यात आली आहे. तालुक्यातील रुग्णांना गंभीर आजार झाल्यास त्यांना पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये उपचारासाठी जावे लागते. अशा वेळी योग्य रुग्णालयाची निवड, उपचार प्रक्रिया, खर्च याबाबत मार्गदर्शन मिळावे आणि रुग्णांना न्याय्य व दर्जेदार उपचार मिळावेत, हा या शाखेचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले.

रुग्ण हक्क परिषद ही डॉक्टरांचे संरक्षण आणि रुग्णांच्या हक्कांसाठी लढणारी भारतातील पहिली आयएसओ मानांकित संघटना असल्याचा दावा संस्थेने केला आहे. ८ एप्रिल २०१४ रोजी उमेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची स्थापना करण्यात आली. रुग्णांना मोफत उपचारांचा हक्क मिळवून देण्यासाठी जनआंदोलनाच्या माध्यमातून काम करण्यावर संस्थेचा भर आहे. परिषदेमार्फत ‘कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियान २०२५-२०२९’ ही पाच वर्षांची मोहीम राबविण्यात येणार असून, कॅन्सरग्रस्त रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. कॅन्सरसारख्या जीवघेण्या आजारामुळे लाखो रुपयांचा खर्च सहन करावा लागतो.

---

तीन तासांच्या शोधानंतर साहेबराव केदारी यांचा मृतदेह सापडला; गावात हळहळ

# शिरदाळे तळ्यात मासेमारीदरम्यान दुर्दैवी घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** (ता. आंबेगाव) : आंबेगाव तालुक्यातील शिरदाळे गावाजवळील तळ्यात मासेमारी करण्यासाठी उतरलेल्या साहेबराव गजानन केदारी (वय ४५) यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दुपारच्या सुमारास घडली. सुमारे तीन तासांच्या अथक शोधमोहीमेनंतर ग्रामस्थांना त्यांचा मृतदेह सापडला. या घटनेमुळे शिरदाळे परिसरात शोककळा पसरली आहे.

शिरदाळे हे डोंगराळ पठारावर वसलेले गाव असून उन्हाळ्यात येथे तीव्र पाणीटंचाई जाणवते. गावातील हा तलावच पाण्याचा प्रमुख स्रोत आहे. तलावात मोठ्या प्रमाणावर मासे असल्याने ठाकर समाजातील नागरिक नियमित मासेमारीसाठी येथे येत असतात.

मंगळवारी दुपारी साहेबराव केदारी व पंढरीनाथ भालेराव हे दोघे मासेमारीसाठी तळ्यात उतरले होते. मासेमारी करत असताना साहेबराव केदारी अचानक पाण्यात बुडाले. ही घटना लक्षात येताच पंढरीनाथ भालेराव यांनी तत्काळ ग्रामस्थांना माहिती दिली.

माहिती मिळताच उपसरपंच बिपिन चौधरी, मयूर सरडे, गणेश तांबे, हनुमंत तांबे, पोलीस पाटील कल्पना चौधरी, निलेश भालेराव यांनी घटनास्थळी धाव घेतली. साहेबराव शिवाजी केदारी, कैलास पडवळ व सचिन तांबे यांनी गळाच्या साहाय्याने शोधमोहीम राबवली. सुमारे तीन तासांच्या प्रयत्नांनंतर मृतदेह बाहेर काढण्यात यश आले. घटनेची माहिती मिळताच पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज तसेच पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब लोहकरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

शिरदाळे तलावात दररोज मोठ्या संख्येने ठाकर समाजातील नागरिक मासेमारीसाठी येत असतात. मात्र मागील अनेक वर्षांत अशी घटना घडली नव्हती, अशी माहिती माजी उपसरपंच मयूर सरडे यांनी दिली. या दुर्दैवी घटनेमुळे केदारी कुटुंबावर शोककळा पसरली असून गावकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

---

## श्री क्षेत्र आळे येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायणास प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** श्री रेडा समाधी मंदिर येथे ७३३ वा संजीवन समाधी सोहळा, माऊली मूर्तीचा ७१ वा वर्धापनदिन आणि महाशिवरात्री निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास उत्साहात प्रारंभ झाला. संत ज्ञानेश्वर महाराजांनी श्रीक्षेत्र पैठण येथे वेद बोलविलेल्या आणि श्रीक्षेत्र आळे येथे स्वहस्ते समाधिस्थ केलेल्या रेडा समाधीच्या स्मरणार्थ हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

ब्रम्हलीन शिवनेरभूषण वै. प. पू. कोंडाजीबाबा डेरे यांच्या कृपाशीर्वादाने सुरू झालेला हा सोहळा रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी महाप्रसादाने सांगता होणार असल्याची माहिती ज्ञानेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अविनाश कुऱ्हाडे व सचिव जीवन शिंदे यांनी दिली.

सप्ताहात दररोज पहाटे काकडा, अभिषेक-पूजा, सामुदायिक ज्ञानेश्वरी पारायण, नेमाचे भजन, हरिपाठ, किर्तन व हरिजागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. विविध मान्यवर ह.भ.प. महाराजांचे कीर्तन होणार असून महाशिवरात्रीला विशेष हरिकीर्तन व पुष्पवृष्टी आयोजित करण्यात आली आहे.

## सारांश वृत्त

### राज्यसभेचे कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली :** राज्यसभेचे कामकाज शुक्रवारी ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आले, कारण स्थायी समित्यांना अर्थसंकल्पीय प्रस्तावांची छाननी करण्याची परवानगी देण्यासाठी संसदेत तीन आठवड्यांची सुट्टी देण्यात आली. सकाळी ११ वाजता शून्य प्रहरासाठी वरिष्ठ सभागृहाची बैठक झाली आणि नियोजित प्रश्नोत्तराच्या तासानंतर दुपारी १ वाजता तहकूब करण्यात आली. त्याआधी लोकसभेचे कामकाजही ९ मार्चपर्यंत तहकूब करण्यात आले.

### ७० लाख रुपयांची विदेशी दारू जप्त

**पलामू (झारखंड) :** झारखंड पोलिसांनी पलामू जिल्ह्यात ७० लाख रुपयांचे बेकायदेशीरपणे वाहतूक केलेले भारतीय बनावटीची परदेशी दारू जप्त केले आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. छत्तीसगड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीवरून झारखंड पोलिसांनी गुरुवारी येथील सद्दीक मंजिल चौकाजवळ चंदीगडहून येणारा एक ट्रक रोखला आणि कोळशाच्या धुळीत लपवून ठेवलेले ८५० दारूचे केस जप्त केले, असे पलामू टाउन पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ज्योती लाल राजवार यांनी सांगितले. तीन जणांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

### ब्रह्मपुत्रा नदीवर ३,००० कोटींचा पूल

**गुवाहाटी :** ब्रह्मपुत्रा नदीवरील ३,००० कोटी रुपयांचा कुमार भास्कर वर्मा पूल, ज्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी करणार आहेत, आसाममध्ये प्रादेशिक संपर्क आणि शहरी गतिशीलता सुधारेल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुवाहाटी आणि उत्तर गुवाहाटीला जोडणारा १.२४ किमी लांबीचा हा पूल भारतातील सर्वात आव्हानात्मक नदीकाठच्या प्रदेशांपैकी एकावर बांधण्यात आला आहे. हे एक महत्त्वपूर्ण अभियांत्रिकी यश आहे असून, आसामच्या वाहतूक प्रणालीतील महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

## आणखी एक विमानवाहू युद्धनौका तैनात करण्याचा निर्णय

# मध्य पूर्वेत अमेरिकेचे शक्तिप्रदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** जगातील सर्वात मोठी अमेरिकन विमानवाहू युद्धनौका यूएसएस जेराल्ड आर. फोर्ड मध्य पूर्वेत तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या योजनेची माहिती असलेल्या एका व्यक्तीने शुक्रवारी याची पुष्टी केली. या हालचालीमुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे इराणवर त्याच्या अणुकार्यक्रमाबाबत करारासाठी दबाव वाढवण्याचे प्रयत्न अधिक बळकट होणार आहेत.

काही दिवसांपूर्वीच ट्रम्प यांनी इराणसोबत चर्चेची आणखी एक फेरी जवळ येत असल्याचे संकेत दिले होते. त्यानंतरच 'फोर्ड'ची तैनाती ठरवण्यात आली. या आठवड्यात तेहरानमधील एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने ओमान आणि कतारला भेट देत



अमेरिकन मध्यस्थांशी संदेशांची देवाणघेवाण केली होती; मात्र प्रत्यक्ष वाटाघाटी अद्याप सुरू झालेल्या नाहीत. गाझा पट्टीतील इस्रायल–हमास युद्धामुळे आधीच अस्थिर असलेल्या मध्य पूर्वेत कोणताही लष्करी हल्ला व्यापक प्रादेशिक संघर्षात रूपांतरित होऊ शकतो, असा इशारा आखाती अरब देशांनी दिला आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात इराणमध्ये देशव्यापी निदर्शनांवर झालेल्या कठोर कारवाईत मृत्युमुखी पडलेल्या हजारो लोकांसाठी पारंपरिक ४० दिवसांचा शोककाल सुरू होत आहे. त्यामुळे निर्बंधांनी त्रस्त असलेल्या इस्लामिक प्रजासत्ताकावर अंतर्गत दबाव आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. या तैनातीमुळे त्या प्रदेशात दोन विमानवाहू नौदल तुकड्या आणि त्यांच्यासोबतची युद्धनौके कार्यरत राहणार आहेत. आधीच यूएसएस अब्राहम लिंकन आणि त्यांच्यासोबतचे मार्गदर्शित क्षेपणास्त्र-विनाशक अरबी समुद्रात तैनात आहेत. या हालचालींबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, लष्करी हालचाली संवेदनशील असल्याने अधिकृत तपशील सध्या जाहीर करण्यात येत नाही.

गेल्या महिन्यात व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक करण्याच्या प्रयत्नांपूर्वीही 'फोर्ड'चा समावेश मोठ्या लष्करी तैनातीमध्ये होता. त्यामुळे ही युद्धनौका पुन्हा एकदा पश्चिम गोलार्धातून मध्य पूर्वेकडे वळवण्यात येत आहे. पश्चिम गोलार्धावर भर देणाऱ्या ट्रम्प यांच्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणाशीही ही तैनाती काहीशी विसंगत मानली जात आहे.

ट्रम्प यांनी गुरुवारी इराणला इशारा देत सांगितले की, करार न झाल्यास परिणाम "अत्यंत क्लेशकारक" असतील. गेल्या आठवड्यात ओमानमध्ये इराण आणि अमेरिकेत अप्रत्यक्ष चर्चा झाली होती. "पुढील महिन्यात काहीतरी घडेल," असे सूचित करत ट्रम्प यांनी इराणने लवकर निर्णय घ्यावा, असे म्हटले.

या आठवड्याच्या सुरुवातीला ट्रम्प यांनी बेंजामिन नेतान्याहू यांच्याशी सविस्तर चर्चा केली. इराणशी वाटाघाटी सुरू ठेवण्याचा सल्ला देतानाच, कोणत्याही कराराअंतर्गत तेहरानवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रम मर्यादित करण्यासाठी आणि हिजबुल्लाहसह दहशतवादी संघटनांना पाठिंबा थांबवण्यासाठी दबाव टाकावा, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## रेराचा राज्यांनी पुनर्विचार करावा: सर्वोच्च न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयने गुरुवारी कठोर शब्दांत निरीक्षण नोंदवत, सर्व राज्यांनी रिअल इस्टेट नियामक प्राधिकरणाच्या (रेरा) रचनेचा आणि कार्यपद्धतीचा पुनर्विचार करण्याची वेळ आली असल्याचे म्हटले. रेरा ही संस्था थकबाकीदार बांधकाम व्यावसायिकांना अप्रत्यक्ष मदत करण्यापलीकडे फारसे काही करत नसल्याचा स्पष्ट टोला न्यायालयाने लगावला.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सांगितले की, ज्या घरखरेदीदारांच्या संरक्षणासाठी रेरा अस्तित्वात आली, तेच नागरिक आज पूर्णपणे निराश आणि वैतागलेले आहेत. रेरा रद्द झाली तरी त्यांना फारसा फरक पडणार नाही, अशी भावना निर्माण होणे ही गंभीर बाब असल्याचेही खंडपीठाने नमूद केले.

हिमाचल प्रदेश सरकारला रेरा कार्यालय त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी हलविण्याची मुभा देताना हे निरीक्षण नोंदवण्यात आले. शिमला येथून धर्मशाळा येथे राज्य रेरा कार्यालय हलविण्याच्या निर्णयाला हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधात राज्य सरकार आणि इतरांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

उच्च न्यायालयाने यापूर्वी जून २०२५ मधील रेरा कार्यालय स्थलांतराच्या अधिसूचनेला पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली होती. त्यानंतर ३० डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशातही ही अंतरिम स्थगिती कायम ठेवण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या ३० डिसेंबरच्या निर्देशांना स्थगिती देत सरकारला दिलासा दिला. रेराच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे, घरखरेदीदारांच्या हितासाठी स्थापन झालेल्या संस्थेचा मूळ उद्देश हरवला आहे.

## भारतीय कपडे होणार ड्यूटी फ्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बांगलादेशला ज्या प्रकारे अमेरिकन कापूस आणि सुतापासून तयार केलेल्या कपड्यांवर सवलती मिळतात, तशाच स्वरूपाच्या सवलती आता भारतालाही मिळणार आहेत. अमेरिका आणि भारत यांच्यात होऊ घातलेल्या आगामी व्यापारी करारामुळे हा मार्ग मोकळा झाला असून, केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी ही माहिती दिली.

भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्याचा मसुदा अंतिम झाला आहे. हा करार मार्च महिन्यात अंमलात येण्याची शक्यता असून, त्यानुसार भारतीय कंपन्यांनी अमेरिकेतून कापूस किंवा सूत आयात करून त्यापासून तयार केलेले कपडे पुन्हा अमेरिकेला निर्यात केल्यास त्यावर आयात कर आकारला जाणार नाही. विद्यमान नियमानुसार अमेरिकेत बांगलादेशातून जाणाऱ्या कपड्यांवर सुमारे ३१ टक्के कर आकारला जातो. मात्र हा कर सवलतीमुळे १९ टक्क्यांनी कमी होऊन १२ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अमेरिकन कापूस आणि मानवनिर्मित तंतूंपासून तयार केलेल्या कपड्यांवर सध्या कोणताही कर आकारला जात नाही. आता भारतालाही अशाच प्रकारचा करमुक्त लाभ मिळणार असल्याने जागतिक बाजारपेठेत भारतीय कापड उद्योगाची स्पर्धात्मक ताकद वाढणार असल्याचा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

अमेरिकेचे कापूस उत्पादन मर्यादित असून त्यांची एकूण कापूस निर्यात सुमारे ५० दशलक्ष अमेरिकी डॉलर इतकी आहे, तर भारताचे कापड व वस्त्र निर्यातीचे उद्दिष्ट सुमारे ५० अब्ज डॉलर इतके मोठे आहे. भारतीय वस्त्र उद्योगाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचा विजयाचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने २०२४ मधील उठावानंतर झालेल्या देशातील पहिल्याच सार्वत्रिक निवडणुकीत विजयाचा दावा केला आहे. पक्षाच्या मीडिया युनिटने शुक्रवारी एक्सवर पोस्ट करत संसदेत स्वतःच्या बळावर सत्तास्थापनेसाठी पुरेशा जागा मिळाल्याचा दावा केला. मात्र बांगलादेश निवडणूक आयोगने अद्याप अंतिम निकाल जाहीर केलेले नाहीत.

दरम्यान, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बीएनपीला निवडणुकीतील निर्णायक



विजयाबद्दल अभिनंदन केले. हा विजय बांगलादेशातील जनतेचा नेतृत्वावरील विश्वास दर्शवतो आणि भारत लोकशाही, प्रगतीशील व समावेशक बांगलादेशच्या समर्थनात उभा राहील, असे त्यांनी म्हटले आहे.

बीएनपीचे नेतृत्व पंतप्रधानपदाचे उमेदवार तारिक रहमान करत आहेत. लंडनमध्ये १७ वर्षांच्या स्व-निर्वासनानंतर ६० वर्षीय रहमान डिसेंबरमध्ये बांगलादेशात परतले. ते माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र असून, झियांचेही डिसेंबरमध्ये निधन झाले होते.

बीएनपीचे वरिष्ठ संयुक्त महासचिव रुहुल कबीर रिझवी यांनी निवेदनाद्वारे पक्षाच्या विजयाबद्दल जनतेचे अभिनंदन केले.

ही निवडणूक प्रामुख्याने बीएनपी आणि जमात-ए-इस्लामीच्या नेतृत्वाखालील ११ पक्षांच्या आघाडीमध्ये झाली. जमात-ए-इस्लामीच्या वाढत्या प्रभावामुळे विशेषतः महिला आणि अल्पसंख्याक समुदायांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

जुलै २०२४ मध्ये विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या रक्तरंजित आंदोलनानंतर माजी पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले होते. त्यामुळे ही निवडणूक बांगलादेशातील लोकशाहीवरील विश्वास पुनर्संचयित करण्याची एक महत्त्वाची कसोटी मानली जात होती.

गेल्या १५ वर्षांतील बहुतांश काळ बीएनपी विरोधी पक्षात होता. त्यांनी अनेक निवडणुकांवर बहिष्कार टाकत हसीनांच्या सरकारवर मतदानातील हेराफेरी आणि राजकीय दडपशाहीचे आरोप केले होते. त्या काळात तारिक रहमान यांच्यावर दाखल झालेले भ्रष्टाचार व गुन्हेगारी खटले सरकार कोसळल्यानंतर रद्द झाल्याने त्यांच्या देशात परतण्याचा मार्ग मोकळा झाला.

## कायद्याचे उल्लंघन केल्याने रशियात व्हॉट्सॲपवर बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** स्थानिक कायद्यांचे पालन न केल्याच्या आरोपाखाली रशियाने मेटा कंपनीच्या मालकीच्या व्हॉट्सॲप या संदेशवहन माध्यमावर बंदी घातली आहे. रशियाच्या सत्ताकेंद्र असलेल्या क्रेमलिनने गुरुवारी फ्रेंच वृत्तसंस्था एएफपीला याची अधिकृत पुष्टी दिली. देशांतर्गत कायद्यांचे उल्लंघन झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे क्रेमलिनकडून सांगण्यात आले.

या बंदीबाबत विचारले असता, क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी असा निर्णय प्रत्यक्षात घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणीही करण्यात आल्याचे स्पष्ट केले. व्हॉट्सॲपने रशियन कायदे, नियम आणि अधिकृत सूचनांचे पालन करण्यास अनिच्छा दाखवली, त्यामुळेच हे पाऊल उचलावे लागल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, व्हॉट्सॲपने यापूर्वीच असा दावा केला होता की रशियन अधिकारी या ॲपवरील प्रवेश मर्यादित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. टेलिग्राम या संदेशवहन मंचाचे संस्थापक पावेल दुरोव्ह यांनी मॉस्को प्रशासनावर त्यांच्या मंचावर अडथळे आणल्याचा आरोप केल्यानंतर व्हॉट्सॲपकडून हे वक्तव्य करण्यात आले होते.

सामाजिक माध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात व्हॉट्सॲपने म्हटले आहे की, रशियन सरकार लोकांना सरकारी देखरेखीखालील ॲपकडे वळवण्यासाठी व्हॉट्सॲप पूर्णपणे बंद करण्याचा प्रयत्न करीत आहे. खाजगी आणि सुरक्षित संवादापासून दहा कोटींपेक्षा अधिक वापरकर्त्यांना दूर ठेवण्याचा हा प्रयत्न मागास पाऊल असून त्यामुळे रशियातील नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होईल, असा दावाही कंपनीने केला आहे. वापरकर्त्यांशी संपर्क टिकवून ठेवण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न सुरू ठेवण्यात येतील, असेही व्हॉट्सॲपने स्पष्ट केले.

## झारखंड उच्च न्यायालयाचे केंद्र व राज्य सरकारांना निर्देश

# बेपत्तांच्या शोधासाठी कार्यपद्धती ठरवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांची :** बेपत्ता मुलांचा शोध घेण्यासाठी आधारशी संबंधित माहितीचा वापर करताना स्पष्ट आणि कायदेशीर मानक कार्यपद्धती ठरवता येईल का, याची शक्यता तपासण्याचे निर्देश झारखंड उच्च न्यायालय यांनी केंद्र व राज्य सरकारांना दिले आहेत. गुमला जिल्ह्यातून एका अल्पवयीन मुलीच्या बेपत्ता होण्याप्रकरणी दाखल बंदीप्रत्यक्षीकरण याचिकेवरील सुनावणीदरम्यान हे आदेश देण्यात आले.

ही याचिका मुलीच्या आई चंद्रमुनी उरेन यांनी दाखल केली होती. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर तिला मानवी तस्करीला बळी पाडले गेले असण्याची शक्यता व्यक्त करत, मुलीचा ठावठिकाणा लावण्यासाठी न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी त्यांनी केली होती. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. याचिकाकर्त्याच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले की सन २०१९ मध्ये मुलगी बेपत्ता झाल्यानंतर प्रथम माहिती अहवाल नोंदवण्यात आला; मात्र स्थानिक




पोलिस तपासात ठोस प्रगती करू शकले नाहीत. तपासाच्या संथ गतीमुळे निराश होऊन, मुलीचा शोध घेण्यासाठी तातडीचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली. गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती सुजित नारायण प्रसाद आणि न्यायमूर्ती ए. के. राय यांच्या खंडपीठाने राज्य सरकार व पोलिसांकडून तपासाच्या प्रगतीचा सविस्तर अहवाल मागवला. राज्य सरकारने आईच्या तक्रारीनुसार गुन्हा नोंद असून तपास सुरू असल्याची माहिती दिली.

गुमला येथील उपविभागीय पोलिस अधिकारी आणि मानव तस्करीविरोधी पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी न्यायालयासमोर हजर राहिले. त्यांनी आतापर्यंत करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील सादर केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नवीन विशेष तपास पथक स्थापन करण्यात आल्याचेही सांगण्यात आले. या पथकाने संभाव्य धागेदोरे तपासण्यासाठी दिल्लीत जाऊन पुरावे गोळा केल्याची माहिती देण्यात आली.

राज्य सरकारने न्यायालयाला कळवले की बेपत्ता मुलीचा फोटो ओळख पटवण्यासाठी विविध माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्यात आला आहे. मात्र अद्याप ठोस यश मिळालेले नसून शोधमोहीम सुरू आहे. प्रभावी तांत्रिक हस्तक्षेपाची गरज अधोरेखित करताना खंडपीठाने नमूद केले की बेपत्ता मुलांच्या प्रकरणांमध्ये आधारशी संबंधित माहितीचा वापर करताना स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या गोपनीयतेचे पूर्ण संरक्षण झाले पाहिजे, याचीही दक्षता घ्यावी लागेल.

बेपत्ता मुलांचे प्रकरण हलक्याने घेता येणार नाही, असे स्पष्ट करत तपास यंत्रणांना मदत करणारी सक्षम आणि सुव्यवस्थित धोरणात्मक चौकट असणे अत्यावश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले. यापूर्वीच्या सुनावण्यांमध्येही बाल तस्करी आणि कायदा अंमलबजावणी संस्थांच्या कार्यक्षमतेबाबत खंडपीठाने तीव्र चिंता व्यक्त केली होती.

## लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लडाखबाबत केंद्र सरकारने आपली भूमिका स्पष्ट केली असून, लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात येणार नसल्याचे तसेच सहाव्या अनुसूचीत समाविष्ट करण्यासही नकार दिल्याचे समोर आले आहे. या मागण्यांसाठी कारगिल लोकशाही आघाडी (केडीए) आणि लेह शिखर परिषद (एलएबी)चे प्रतिनिधी दिल्लीत दाखल झाले होते.

४ फेब्रुवारी रोजी गृह मंत्रालयाच्या उच्चाधिकार समितीबरोबर लडाखमधील प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत केंद्राने लडाखसाठी प्रादेशिक परिषदेचा पर्याय मांडला. प्रस्तावानुसार, लडाख स्वायत्त टेकडी विकास परिषदच्या प्रमुखांना मुख्यमंत्र्यांचा, तर उपमुख्य कार्यकारी नगरसेवकांना उपमुख्यमंत्र्यांचा दर्जा देण्याची तरतूद सुचवण्यात आली. मात्र, हा प्रस्ताव केडीए आणि एलएबी या दोन्ही संघटनांनी फेटाळला. केडीएचे अधिकारी असगर अली करबली यांनी सांगितले की, हा प्रस्ताव आम्ही स्वीकारलेला नाही. केवळ एक सदस्य, कुन्झेस डोल्मा यांनी केंद्राच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे. लडाखच्या ओळखीशी तडजोड करणारा कोणताही निर्णय स्वीकारला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

करबली यांच्या मते, कारगिलमधील अलीकडील मेळाव्यात राज्याच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी झाली. या आंदोलनाशी संबंधित सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थही घोषणा देण्यात आल्या. सप्टेंबर २०२५ मध्ये राज्याच्या मागणीसाठी झालेल्या निदर्शनांदरम्यान त्यांना अटक करण्यात आली होती आणि ते अद्याप कारागृहात आहेत.

गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांची भेट घेतल्यानंतर करबली आणि लडाख बौद्ध संघटनेचे अध्यक्ष त्सेरिंग दोर्जे लाक्रुक यांनी चर्चा सर्वसमावेशक झाल्याचे सांगितले. मात्र पूर्ण राज्याचा दर्जा आणि सहावी अनुसूची याबाबत केंद्राची भूमिका बदललेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले. करबली यांनी आरोप केला की, सहाव्या अनुसूचीत आता अधिकार उरलेले नाहीत, असे गृह मंत्रालयाकडून सांगण्यात आले. तसेच लडाखकडे पुरेशी आर्थिक साधनसंपत्ती नाही, हा युक्तिवादही मांडण्यात आला.

## केरळमध्ये पार्किंग वादातून गुन्हा

**कोची :** शेजाऱ्यांमधील पार्किंगशी संबंधित वादामुळे दोन आयटी व्यावसायिकांवर हल्ला केल्याबद्दल आणि पलारीवट्टोमजवळील त्यांच्या घरात घुसून त्यांना धमकावल्याबद्दल एकाच कुटुंबातील तीन सदस्यांसह १० जणांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले. शेजारच्या कुटुंबातील काही सदस्यांनी एका व्यावसायिकाला शिवीगाळ केली, जबरदस्तीने घराच्या आवारात घुसत पार्किंगवरून झालेल्या वादातून मारहाण केली होती.

## पदोन्नतीत कॅडरमधील ज्येष्ठताच निर्णायक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** ज्येष्ठता-सह-गुणवत्ता या तत्वावर पदोन्नती देताना कर्मचाऱ्याची प्रारंभिक नियुक्तीची तारीख नव्हे, तर तो ज्या कॅडरमध्ये कार्यरत आहे त्या कॅडरमधील ज्येष्ठता निर्णायक ठरेल, असा महत्त्वाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे.

या प्रकरणात याचिकाकर्त्या कर्मचाऱ्याने असा दावा केला होता की, त्याची प्रारंभिक नियुक्ती इतर कर्मचाऱ्यांपूर्वी झाल्याने पदोन्नतीसाठी त्याला ज्येष्ठतेचा लाभ मिळायला हवा. मात्र प्रशासनाने पदोन्नती देताना संबंधित कर्मचाऱ्याची सध्याच्या कॅडरमधील सेवाज्येष्ठता विचारात घेतली होती. या निर्णयाला आव्हान देत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की ज्येष्ठता-सह-गुणवत्ता हे तत्व पूर्णतः ज्येष्ठतेवर आधारित पदोन्नती सूचित करत नाही. या तत्वानुसार, संबंधित कॅडरमधील ज्येष्ठ कर्मचाऱ्यांमधून गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारे निवड केली जाते. त्यामुळे केवळ प्रारंभिक नियुक्तीची तारीख हा एकमेव निकष मानता येणार नाही.

न्यायालयाने असेही नमूद केले की, कर्मचाऱ्याची सेवा जर वेगवेगळ्या पदांवर किंवा वेगवेगळ्या कॅडरमध्ये झालेली असेल, तर पदोन्नतीचा विचार करताना त्याची सध्याच्या कॅडरमधील ज्येष्ठता महत्त्वाची ठरते.

## अंदाजे किंमत सुमारे १०,००० कोटी रुपये असल्याचा अंदाज

# रशियाकडून २८८ एस-४०० क्षेपणास्त्रांच्या खरेदीला मान्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेच्या बैठकीत रशियाकडून २८८ एस-४०० क्षेपणास्त्रे खरेदी करण्यासाठी आवश्यक तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. या खरेदीची अंदाजे किंमत सुमारे १०,००० कोटी रुपये असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मे २०२५ मध्ये झालेल्या ऑपरेशन सिंदूरदरम्यान मोठ्या प्रमाणावर वापर झालेल्या क्षेपणास्त्रांचा साठा पुन्हा भरून काढण्यासाठी तसेच देशाची हवाई संरक्षण क्षमता अधिक मजबूत



करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मंजूर करण्यात आलेल्या मान्यतेनुसार, यामध्ये १२० लघु-श्रेणी आणि १६८ दीर्घ-श्रेणी एस-४०० क्षेपणास्त्रांचा समावेश आहे. ही खरेदी जलद मार्ग प्रक्रियेद्वारे केली जाणार आहे.

दरम्यान, याच वर्षी जून आणि नोव्हेंबर महिन्यात भारताला आधीच्या करारानुसार आणखी दोन एस-४०० प्रणाली मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय, हवाई दलाकडून एस-४०० प्रणालीसोबत ड्रोन आणि स्फोटक ड्रोनविरोधात प्रभावी ठरणाऱ्या पँटसिर लघु-श्रेणी संरक्षण प्रणालीच्या खरेदीचा प्रस्तावही विचाराधीन आहे.

ऑपरेशन सिंदूरमध्ये एस-४०० प्रणालीची भूमिका अत्यंत निर्णायक ठरली. या कारवाईदरम्यान भारतीय सशस्त्र दलांनी एस-४०० क्षेपणास्त्रांचा प्रभावी वापर करून पाकिस्तानी लढाऊ विमाने, पूर्वसूचना देणारी विमाने तसेच सशस्त्र ड्रोन पाडले होते. त्यामुळेच या प्रणालीचा साठा वाढवण्याची गरज निर्माण झाल्याचे सांगितले जाते. विशेष बाब म्हणजे, पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात सुमारे ३१४ किलोमीटर अंतरावर एस-४०० क्षेपणास्त्राद्वारे एक मोठे विमान पाडण्यात आल्यानंतर, पाकिस्तानी हवाई दलाने आपली बहुतांश कार्यरत विमाने अफगाणिस्तान आणि इराणमधील जवळच्या हवाई तळांवर हलवली होती. आदमपूर आणि भुज क्षेत्रात तैनात असलेल्या एस-४०० प्रणालींच्या भीतीमुळे ९ आणि १० मे रोजी पाकिस्तानी हवाई दल जवळजवळ निष्क्रिय राहिले होते.

भारताची संरक्षण खरेदी प्रक्रिया ही अनेक टप्प्यांतून जाते. प्रस्तावाची सुरुवात प्रकरण निवेदनापासून होते. त्यानंतर तो संरक्षण खरेदी मंडळाकडे आणि पुढे संरक्षण अधिग्रहण परिषदेकडे पाठवला जातो. किंमत वाटाघाटीनंतर अंतिम मंजुरी सुरक्षा विषयक मंत्रिमंडळ समितीकडून दिली जाते.

गुरुवारी झालेल्या बैठकीत संरक्षण मंत्र्यांनी सुमारे ३.६० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध प्रस्तावांना तत्त्वतः मान्यता दिली. यामध्ये राफेल लढाऊ विमाने, विविध लढाऊ क्षेपणास्त्रे, उच्च उंचीवरील छद्म उपग्रह, अँटी-टँक स्फोटके, रणगाडे व लढाऊ वाहनांचे दुरुस्ती व आधुनिकीकरण, सागरी वायू टर्बाइनवर आधारित विद्युत जनित्रे तसेच दीर्घ पल्ल्याची सागरी टोही विमाने यांचा समावेश आहे. यापैकी बहुतांश लढाऊ विमाने देशातच तयार केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.